महाराष्ट्र शासन

वनविभाग

# उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली

वनविभागातील गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता जाहीरातीचा नमुना

**जाहिरात क्रमांक - कक्ष-५(४)/आस्था/२८८१/२०१२-१३/दिनांक २८/१२/२०१२**

गडचिरोली (प्रादेशिक) वनवृत्त, गडचिरोली मधील खालील नमुद गट-क संवर्गातील रिक्त पदांवर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करीत असलेल्या व वनविभागातील भरतीसाठी इच्छुक उमेदवारांनी अर्ज भरण्यापुर्वी संपुर्ण जाहिरात व अनुषगिक सूचना काळजीपुर्वक वाचुन सोबतच्या विहीत नमुन्यातील आपला अर्ज पत्र व्यवहाराकरीता जाहीरातीतील मुद्दा क्रमांक **१२** मध्ये नमुद पत्त्यावर ***दिनांक २१.१.२०१३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत किंवा तत्पुर्वी पोहचतील*** अशा बेताने पाठवावा.

१.००　　　　रिक्त पदांचा तपशिल

| संवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | एकुण (अबकड) | वि.मा.प्र. | ई.मा.व | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| लिपीक | ३ (१) | ४ (२) | १ | १ | १ | १ | ४ | १ | १ | ४ (१) | १७ |
| वाहन चालक | ४ (१) | ३ (१) | ० | ० | १ | १ | २ | ० | ४(१) | ८(३) | २१ |
| **एकुण :-** | **७** | **७** | **१** | **१** | **२** | **२** | **६** | **१** | **५** | **१२** | **३८** |

**टिप :- कंसातील नमुद पद संख्या महिला समांतर आरक्षणाची आहे.**

२.०० उपरोक्त पदांसाठी समातंर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | विशेष समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा. अ. | भ.ज. ब. | भ.ज. क. | भ.ज. ड. | वि.मा.प्र. | ई.मा.व. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **लिपीक -नि- टंकलेखक** | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | रोजंदारी वनमजूर | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | प्रकल्प ग्रस्त/ धरणग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भुकंपगस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | १ |
| | माजी सैनिक | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडु | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **सर्वसाधारण** | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | १ | ८ |
| | **एकुण** | **३** | **४** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **१** | **४** | **१७** |
| **वाहन चालक** | पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | रोजंदारी वनमजूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| | प्रकल्प ग्रस्त/ धरणग्रस्त | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ |
| | भुकंपगस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | अपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | माजी सैनिक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ३ |
| | अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | **सर्वसाधारण** | २ | १ | ० | ० | १ | १ | ० | २ | ४ | ११ |
| | **एकुण** | **४** | **३** | **०** | **०** | **१** | **१** | **०** | **४** | **८** | **२१** |

**(टिप :-रोजंदारी वनमजुरांचे आरक्षण महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र.बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९, दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ घेण्यात आले असल्याने त्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.)**

३) भरती प्रक्रिया राबवावयाच्या पदाची सहाव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी (पे बॅन्ड व ग्रेड पे) |
|---|---|---|
| १ | **लिपीक -नि- टंकलेखक** | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |
| २ | वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९००/- |

४) वेगवेगळया गट-क पदासाठी तत्कालीन मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पत्र क्रमांक कक्ष-बी/९/६७/ ७५७९ दि. १८/२/१९७६ आणि क्रमांक कक्ष-बी/९/६७/४१८० दि. ३०/९/१९७६ मध्ये नमुद प्रमाणे किमान शैक्षणीक अर्हता तसेच शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्र. ४६/०७/१३ अ दि. १०/१०/२००७ मध्ये नमूद नुसार लेखी परिक्षा / व्यावसायीक चाचणीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहील.

४.१ **लिपीक-नि-टंकलेखक** :-अ) शैक्षणीक अर्हता I) उमेदवार हा शैक्षणीक अर्हता किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.

ब) ईतर अटी व शर्ती I) टंकलेखनाची मराठी किमान ३० श.प्र.मि./इंग्रजी ४० श.प्र.मि. शासन मान्य परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

II) संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र प्राधान्यशिल.

III) गडचिरोली जिल्हयाची भौगोलीक स्थितीची माहिती असणे आवश्यक आहे.

IV) उमेदवारास मराठी भाषा लिहता, बोलता, वाचता आली पाहीजे.

४.२ **वाहन चालक** :- अ) शैक्षणीक अर्हता I) उमेदवार हा इयत्ता ४ था वर्ग उत्तीर्ण असावा.

ब) ईतर अटी व शर्ती I) जड वाहन चालविण्याचा वैध परवाना असावा.

II) कमीत-कमी ३ वर्ष वाहन चालविण्याचा अनुभव (नोंदणीकृत संस्थेच्या/व्यावसायीकाच्या) असणे आवश्यक आहे.

III) प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडुन वाहन चालकाचे अनुज्ञप्ती विवरण (Motor Driving Licence Particulars) प्राप्त करुन जोडणे आवश्यक आहे.

IV) गडचिरोली जिल्हयाची भौगोलीक स्थितीची माहिती असणे आवश्यक आहे.

V) उमेदवारास मराठी भाषा लिहता, बोलता, वाचता आली पाहीजे.

**टिप :- वरील सर्व पदांना वर नमुद शैक्षणिक अर्हता ही किमान आहे. यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारांना प्राधान्य राहील. तसेच वरील प्रमाणे आवश्यक दस्तावऐवजाच्या साक्षाकिंत प्रती अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे.**

५.१ वरील अनुक्रमांक ४.१ ते ४.२ चे पदाकरीता लेखी परिक्षेचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदाचे नांव | परिक्षेचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | वाहन चालक | १०० गुणांची लेखी परिक्षा.<br>८० गुणांची व्यावसायीक चाचणी.<br>२० गुणांची मुलाखत. |
| २ | लिपीक-नि-टंकलेखक | २०० गुणांची लेखी परिक्षा |

५.२ जाहीरातीत नमुद केलेल्या पदसंख्या दिनांक ३१.१२.२०१२ पर्यन्त रिक्त होणाऱ्या पदांवर आरक्षित असल्याने सदर नियुक्ती या रिक्त पदाच्या उपलब्धतेवर अवलंबुन राहील. तसेच जाहिरातीत उल्लेख केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**६.१ वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय दिनांक ०१/१२/२०१२ रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

६.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथीलक्षम.

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागावसर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यत.

(दोन) माजी सैनिकाच्या बाबतीत प्रचलित नियमानुसार.

(तीन) पात्र खेळाडुंच्या बाबतीत ५ वर्षापर्यत.

(चार) स्वातंत्र संग्राम सैनिक पाल्य, धरणग्रस्त/भुकंपग्रस्त पदवीधर/पदवीधारक/अंशकालीन कर्मचारी/ उमेदवाराच्या बाबतीत शासन नियमातील तरतुदीनुसार.

(सहा) वनविभागातील अधिसख्य वनमजुर/रोजंदारी वनमजुर यांचेकरीता प्रचलीत नियमानुसार.

७.० निवडीची पध्दत :- वर अधिसूचित केलेल्या रिक्त पदासाठी खालील प्रमाणे निवड पध्दत अवलंबविण्यात येईल.

७.१ लिपीक-नि-टंकलेखकः-शासन निर्णय दि. १९.१०.२००७ अन्वये लेखी परिक्षेत ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारीची अंतिम निवड यादी करण्यात येईल.

७.२ मौखिक परीक्षेकरीता:- वाहन चालक पदासाठी दि. १९.१०.२००७ च्या शासन निर्णयाचे आधारे ते व्यावसायीक परिक्षेकरीता पात्र राहतील. तसेच लेखी व व्यावसायीक परीक्षेच्या आधारे दि.२७ जुन २००८ च्या शासन निर्णयानुसार लघुयादी तयार करण्यांत येईल.

७.३ लघु यादीतील उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे असेल :-

७.४.१ रिक्त पदांची संख्या ५ पदापर्यंत :- मुलाखतीसाठी बोलावयाच्या उमेदवारांची संख्या रिक्त पदाच्या संख्येच्या ५ पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित.

७.४.२ सहा व त्याहुन अधिक पदासाठी :- मुलाखतीसाठी बोलावयाच्या उमेदवारांची संख्या रिक्त पदाच्या संख्येच्या ३ पटीत.

८.० परिच्छेद ७.३ नुसार तयार केलेल्या लघु यादीतील उमेदवारांची पदाच्या आवश्यकतेनुसार उमेदवाराचे व्यक्तीमत्व, क्रिडा व सांस्कृतीक कार्य, विशेष कार्यक्षमता (उदा. किमान शैक्षणीक अर्हतापेक्षा उच्च शिक्षण / तांत्रीक विषयावरील प्रशिक्षण / संगणकाचे ज्ञान) सामान्य ज्ञान, स्थानिक क्षेत्राचे ज्ञान व पदासाठी उमेदवारांची सर्वसाधारण योग्यता या बाबीसंबंधी मौखिक परिक्षा जिल्हा निवड समिती मार्फत घेऊन योग्यता निर्धारीत केली जाईल. **उमेदवार मौखिक परिक्षेत अनुपस्थित राहील्यास त्यांना अपात्र ठरवुन त्यांचे नांव गुणवत्तेनुसार तयार केलेल्या निवड यादीतुन वगळयात येईल.**

**९.० सर्वसाधारण अटी.**

९.१ सेवा प्रवेश नियमातील अटीनुसार संबंधीत संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे.

९.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

९.३ सामान्य प्रशासन विभाग क्र.एस.आर.व्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८१/१३-अ, दिनांक १६/३/१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा., अ.ज., वि.जा. (अ), भज(ब), भज(क), भज(ड), विमाप्र, इमाव आणि खुला प्रवर्ग ) विशेष आरक्षणानुसार होणा-या राखीव पदांची संख्या पदाचा तपशील या शिर्षा अंतर्गत दर्शविण्यात आलेला आहे. **समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास प्रचलीत शासन निर्णयानुसार सर्व समांतर पदे त्या-त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येतील. तसेच माजी सैनिक/अपंग माजी सैनिक नेमणुकीसाठी उपलब्ध न झाल्यास शासन परिपत्रक दि. १४.५.१९८६ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.**

९.४ वि.जा. (अ), भज(ब), भज(क), भज(ड), विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांसाठी शासन परिपत्रक सामान्य न्याय सांस्कृतीक न्याय व विशेष साहाय्य विभाग क्र.सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र.१५/मा.व.क.-५ दिनांक ३०/६/२००६ सोबतच्या सुधारीत नमुन्यात त्यांची जात उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारीत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यास योग्य समजता येईल. खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्गीय, भटक्या जमाती (क) व भटक्या (ड) या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले ३०% आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ती/गटातील (क्रिमीलेअर) कुटूंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

९.५ महिला आरक्षणाकरीता अर्ज करतांना खुल्या प्रवर्गातील व मागास प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी त्यांची जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) निकटतम वर्षाचे कालावधीचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९.६ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडु उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागास वर्ग प्रवर्गातील इतर मागास वर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

९.७ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयांकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर या कार्यालयाकडे विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज सादर करावा.

९.८ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व अधिसंख्य वनमजुरांनी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहे त्या पदाकरीता विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे सरळमार्गाने अर्ज सादर करावा.

९.९ वनविभागातील कार्यरत रोजंदारी वनमजुरांनी ते ज्या पदाची पात्रता धारण करीत आहे त्या पदाकरीता विहीत केलेल्या पध्दतीप्रमाणे सरळमार्गाने आरक्षित जागेवर अर्ज सादर करावा. ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत त्या राजपत्रीत अधिका-याचे प्रमाणपत्र (प्रमाणपत्रात ते कामावर लागल्याची तारीख व सध्या कार्यरत असल्याबाबत स्पष्ट नमुद असणे गरजेचे आहे)

९.१० अनुभवाच्या बाबतीत तासीका, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालीक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणुन नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. तसेच त्यांनी प्रचलित नियमानुसार प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

९.११ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवाराची अंतिम निवड करणे जाहिरातीचे अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे या बाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहे.

९.१२ सेवा शर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल. याबाबत पत्र व्यवहार करणे बंधनकारक राहणार नाही.

९.१३ उमेदवारांना लेखी / व्यावसायीक परिक्षा व मुलाखती करीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

९.१४ उमेदवारांनी अर्जामध्ये त्यांचे संपुर्ण पत्त्यामध्ये **पिनकोड क्रमांक लिहीणे गरजेचे आहे.**

९.१५ लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण प्राप्त उमेदवारांनाच (शासन निर्णय दि. १९.१०.२००७ च्या अधिन राहुन) व्यावसायीक चाचणी / मुलाखत देता येईल.

१०.०० सेवाशुल्क :- अर्जासोबत खुल्या प्रवर्गातील लिपीक-नि-टंकलेखक, वाहन चालक **या पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारास रु. २००/- व राखीव प्रवर्गातील उमेदवारांने रु. १००/- चा न्यायालयीन फी मुद्रांक विक्रेत्याचे पावती सोबत जोडणे आवश्यक आहे.** क्वचित प्रसंगी उमेदवारास न्यायालयीन फी मुद्रांक मिळणे शक्य नसेल तर रेखांकित भारतीय पोष्टल ऑर्डर **उप वनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली** यांचे नांवे स्विकारण्यात येईल. (या व्यतिरीक्त बँक डिमांड ड्रॉफ्ट व इतर मुद्रांक फी म्हणुन ग्राहय धरण्यात येणार नाही व सदरचे अर्ज रद्द-बातल ठरतील) माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागु नाही.

११.०० **अर्ज करण्याची पध्दत** :- सोबत दिलेल्या नमुन्यात ए-४ (३० x २० सें.मी.) आकाराच्या पांढ-या जाड कागदावर एकाच बाजुला टंकलिखीत वा चक्र मुद्रीत करुन अर्ज करावा. उमेदवारांनी अर्जातील माहिती तपशिल सुस्पष्टपणे नमुद करावा. उमेदवाराने ओळख पत्रातील छायाचित्राच्या आकाराचे त्यांचे अलिकडचे (३ महिन्यापुर्वीचे) **साक्षांकित छायाचित्र** आवेदन पत्रावर विहीत जागी घट्ट चिकटवावे. **अर्जासोबत पदाच्या संबंधित किमान शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका, वय, जात, अनुभव व इतर प्रमाणपत्राच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे बंधनकारक आहे.** कोणतेही दस्ताऐवज नंतर लावता येणार नाही. तसेच विहीत नमुन्यामध्ये भरुन पाठविलेले आवेदन पत्र **पुढील पत्त्यावर विहीत केलेल्या अंतिम तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी म्हणजेच दि.२१.१.२०१३ चे सायंकाळी ५-०० वाजेपावेतो पोहचतील अशा बेताने पाठवावेत. दि.२१.१.२०१३ चे सायंकाळी ५-०० वाजेनंतर कोणत्याही कारणाने विलंबाने प्राप्त होणारे अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अर्ज पाठवितांना बाहेरील लिफाफ्यावर ज्या पदासाठी अर्ज असेल ते पद स्पष्टपणे लिहावे. तसेच या लिफाफ्यावरील इतर मजकुर खालील प्रमाणे असावा.**

**(लिफाफ्याचा नमुना)**

**वनविभागातील ' वर्ग - क ' भरती प्रक्रिया - २०१२-२०१३**

**पदाचे नांव** :- ------------------------------------

प्रति,
सदस्य सचिव तथा
उपवनसंरक्षक, गडचिरोली
पोटेगांव रोड
तहसिल जिल्हा गडचिरोली (म.रा.)
पिन कोड ४४२ ६०५

प्रेषक : --------------------
संपुर्ण पत्ता ------------------
------------------
पिन कोड

१२.०० **अर्ज स्विकारणे** :-उमेदवाराने आपले अर्ज जाहिरातीतील विहीत नमुन्यातील विहीत मुदतीत शक्यतो नोंदणीकृत डाकेने / पोच देय डाक नोंद टपालाने पाठवावे व त्या टपालाची पावती जतन करावी. उमेदवारांना निवड प्रक्रियेच्या टप्पा निहाय वेळापत्रकानुसार विविध चाचण्यासाठी उपस्थित राहावे लागेल. यासाठी उमेदवारास, व्यक्तीगतरित्या वेगळयाने चाळणी परिक्षा / अभियोग्यता व्यावसायीक परिक्षेसाठी लेखी पत्र पाठविले जाणार नाही. तथापी वेळापत्रकात बदल झाल्यास त्यांची माहिती शक्य असल्यास वर्तमानपत्रात जाहिरातीने वनविभागाच्या वेबसाईट www.mahaforest.nic.in अथवा उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचे कार्यालयाचे सूचना फलकावर लावुन देण्यात येईल. लघु यादीतील उमेदवारांना मौखिक परिक्षेबाबत व शारिरीक क्षमतेच्या परिक्षेसाठी लेखी पोष्टामार्फत कळविण्यांत येईल. अपूर्ण माहिती असलेल्या किंवा अपूर्ण दस्ताऐवज / प्रमाणपत्र / कमी फी / जाहिरातीतील विहीत नमुन्यातील अर्ज नसलेल्या अर्जाचा निवड प्रक्रियेसाठी विचार केल्या जाणार नाही. सेवा प्रवेश नियमानुसार अपात्र उमेदवारांना लेखी सूचना दिल्या जाणार नाहीत. अर्जदाराचे अर्ज खालील पत्त्यावर स्विकारण्यात येतील.

सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक, गडचिरोली
पोटेगाव रोड, गडचिरोली
तहसिल जिल्हा गडचिरोली.
(म.रा.) पिन कोड 442 605

**१३.०० भरती बाबत अर्जासाठी इतर आवश्यक सूचना :-**

१३.१ प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे आवेदनपत्र भरणे आवश्यक राहील.

१३.२ **अर्जासोबत किमान शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका (संपुर्ण संधीच्या) वय, जात, अधिवास प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्याप्रती राजपत्रित अधिकारी यांचेकडून साक्षांकित केलेल्या जोडणे आवश्यक आहे.**

१३.३ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही.

१३.४ महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मधील निर्देशानुसार मागासप्रवर्गाच्या उमेदवारांना नियुक्तीचे वेळी जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१३.५ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविल्या जाईल.

१३.६ निवड झालेल्या उमेदवारांची गडचिरोली वनवृत्ताअंतर्गत ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकते.

१३.७ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारिरिकदृष्टया इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

१३.८ लेखी/व्यावसायीक परिक्षेच्यावेळी अर्जात दिलेल्या नमुन्यातील ओळखपत्र सोबत आणावे. सदरचे ओळखपत्र सर्व भरती प्रक्रियेसाठी आवश्यक राहील.

१३.९ महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एसटीसी-१०९९/प्र.क्र.१४/का-१० दिनांक १६/८/२००० नुसार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्तीच्या वेळेस जातीवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. जातीवैधता प्रमाणपत्र सादर केल्या नंतरच नियुक्ती देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतीक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२००३/पत्र क्र.९१/मावक-५, दिनांक २४ जानेवारी २००४ अन्वये मागास वर्गीयासाठी (अनुसूचित जमाती वगळुन) राखीव असलेल्या जागेवर निवड केलेल्या उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत विभागानी करुन घेण्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे त्वरीत सादर करतील.

**१४.०० त्रृटी असलेले अर्ज अस्विकृत केले जातील :-**

१४.१ सुवाच्य अक्षरात नसलेले व अपुर्ण किंवा चुकीची माहिती भरलेले अलिकडील छायाचित्र (फोटो) त्यावर राजपत्रित अधिकारी यांचेकडून साक्षांकित न केलेले तसेच उमेदवाराने अर्जावर स्वाक्षरी न केलेले अर्ज.

१४.२ अर्जासोबत किमान शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका (संपुर्ण संधीच्या) वय, जात, अधिवास प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्राच्याप्रती राजपत्रित अधिकारी यांचेकडून साक्षांकित न केलेले अर्ज.

१४.३ अर्ज स्विकारण्याची **अंतिम दिनांक २१.१.२०१३ सायंकाळी ५.०० वाजेपावेतो प्राप्त होणारे अर्ज.**

**१५.०० निवड प्रक्रियेचे वेळापत्रक :-**

**निवड प्रक्रियेचा कार्यक्रम (वेळापत्रक) खालील प्रमाणे राहील.**

| अ.क्र. | निवड प्रक्रियेचे टप्पा निहाय वेळापत्रक | तारीख |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख | दिनांक २१.१.२०१३ |
| २ | पात्र/अपात्र अर्जदारांची यादी जाहिर करणे व उमेदवारास प्रवेशपत्र देणे.<br>स्थळ : उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचे कार्यालय. | दिनांक २८.१.२०१३ |
| ३ | अपात्र अर्जदाराची पात्रतेसाठी तक्रार अर्ज सचिव तथा उप वनसंरक्षक गडचिरोली वनविभाग, गडचिरोली यांचेकडे सादर करण्याची तारीख. (तक्रार अर्जासोबत कोणतेही नविन कागदपत्रे स्विकारण्यात येणार नाही) | दिनांक २९.१.२०१३ |
| ४ | तक्रार अर्जाचा निकाल -<br>स्थळ : उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येईल. | दिनांक ३०.१.२०१३ |
| ५ | सर्व पदांसाठी लेखी परिक्षेची तारीख.<br>स्थळ : नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येईल. | दिनांक ३.२.२०१३ |
| ६ | लिपीक पदाचे लेखी परिक्षेचा निकाल तसेच वाहन चालक पदाकरीता व्यावसायीक परिक्षेसाठी लघु यादी जाहीर करण्याची संभाव्य तारीख (निश्चित तारीख वर्तमान पत्रामार्फत सूचना देण्यात येईल व उपवनसंरक्षक, गडचिरोली यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येईल.) | दिनांक ४.२.२०१३ |
| ७ | लिपीक पदास पात्र उमेदवारांची अंतिम निवड यादी. | दिनांक ८.२.२०१३ |
| ७ | आवश्यक पदाची व्यावसायीक परीक्षा घेणे. | दिनांक ११ ते १३.२.२०१३ |
| ८ | मौखीक परिक्षेकरीता पात्र उमेदवाराची लघू यादी जाहीर करणे. | दिनांक १६.२.२०१३ |
| ९ | वाहन चालक पदाकरीता पात्र ठरलेलल्या उमेदवारांची मौखीक परिक्षेकरीता शैक्षणिक अर्हतेचे दस्तावेज तपासणी. | वेगळयाने घोषीत करण्यात येईल. |
| १० | मौखीक परिक्षा | वेगळयाने घोषीत करण्यात येईल. |
| ११ | वाहन चालक पदासाठी निवड यादी तयार करुन निकाल जाहीर करणे. | वेगळयाने घोषीत करण्यात येईल. |

१) लेखी परिक्षा / व्यावसायीक परिक्षेसाठी हजर व्हावयाचे ठिकाण :- सदर परिक्षेचे स्थळ उपवनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली पोटेगांव रोड, गडचिरोली तहसिल जिल्हा गडचिरोली यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डवर जाहीर करण्यात येईल. तसेच शक्य झाल्यास वनविभागाचे वेब साईट वर www.mahaforest.nic.in वर जाहीर करण्यात येईल.

**टिप :- नमुद तारखांमध्ये बदल झाल्यास तसे कार्यालयाचे सूचना फलकावर लावण्यात येईल. तसेच शक्य झाल्यास वनविभागाचे वेब साईट वर www.mahaforest.nic.in वर जाहीर करण्यात येईल.**

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती, गडचिरोली
तथा
उपवनसंरक्षक
गडचिरोली वनविभाग, गडचिरोली

# गडचिरोली (प्रादेशिक) वनवृत्तासाठी अर्जाचा नमुना

उमेदवाराचे छायाचित्र राजपत्रीत अधिकारी/पिशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी साक्षांकीत करणे गरजेचे आहे.

**जाहिरात क्रमांक कक्ष-५(४)/आस्था/१२-१३/ दिनांक / /२०१२**

१. अर्ज केलेल्या पदाचे नांव :- ------------------------------------------------------------

२. उमेदवाराचे पुर्ण नांव आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठी ------------------- ------------------- ------------------

इंग्रजी ------------------- ------------------- ------------------

३. कायमचा पत्ता : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

मोबाईल नंबर ------------------------------------------------

पिन कोड क्रमांक | | | | | | |

४. पत्रव्यवहाराचा पत्ता : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

पिन कोड क्रमांक | | | | | | |

५ (अ) यापैकी लागू असलेल्या प्रवर्गाची ( ✓ ) अशी खुण संबंधित प्रवर्गाच्या रकाना खाली करावी.

| खुला | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | धनगर व तत्सम (क) | बंजारी व तत्सम (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इमाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

(ब) जात (मागासवर्गीय असल्यास जात/पोटजात व प्रवर्ग जाती किंवा वैधता प्रमाणपत्रानुसार) नमुद करावी. --------------------------

६. समांतर आरक्षण लागू असल्यास योग्य रकान्यात ( ✓ ) अशी खुण करावी.

| पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | रोजंदारी वनमजुर | प्रकल्प ग्रस्त/ धरणग्रस्त | अपंग | माजी सैनिक/ विरपत्नी | अती उच्च गुणवता धारक खेळाडु |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

**(समांतर आरक्षणाचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.)**

७ राष्ट्रीयत्व --------------------------

८ महाराष्ट्र राज्याचे कायमचे रहिवासी आहात काय ? होय / नाही
(असल्यास, सोबत दाखला जोडावा)

९ उमेदवार पुरुष किंवा स्त्री आहे. पुरुष / स्त्री

१०. उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेयर) निकटतम वर्षाचे (वर्ष २०११-१२) कालावधीचे प्रमाणपत्र आहे काय ? आहे / नाही

११. जन्मतारीख (शाळा सोडल्याच्या दाखल्यानुसार) दिनांक -------- महिना --------- वर्ष ---------

१२. दिनांक ०१/०१/२०१२ रोजीचे वय ------ वर्ष -------- महिना --------- दिवस -------

१३. जन्म ठिकाण : गांव / शहर ------------------ जिल्हा ----------------- राज्य ----------------

१४. मराठी भाषेचे ज्ञान
१. मराठीत बोलणे :- येतात / येत नाही
२. मराठीत लिहिणे :- येतात / येत नाही
३. मराठीत वाचणे :- येतात / येत नाही

१५. शैक्षणिक अर्हता किंवा तत्सम परिक्षेपासून उत्तीर्ण सर्व परीक्षेचा तपशिल (प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत जोडावी)

| अ. क्र. | परीक्षेचे नांव | शाळेचे/बोर्डाचे/ विद्यापिठाचे/ संस्थेचे नांव | विषय | परिक्षेत मिळालेले गुण | टक्केवारी | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ थी | | | | | |
| २ | ७ वी | | | | | |
| ३ | १० वी | | | | | |
| ४ | १२ वी | | | | | |
| ५ | पदवी | | | | | |
| ६ | पदव्युत्तर | | | | | |
| ७ | पदविका | | | | | |
| ८ | इतर | | | | | |

१६. संगणक प्रशिक्षित आहात काय ? होय / नाही
(शासन मान्य एम.एस.सी.आय.टी.) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी)
१७. एन.सी.सी. प्रमाणपत्र आहेत काय ? (प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी) होय / नाही

| प्रकार | वर्ष | वर्ग (ग्रेड) |
|---|---|---|
| एन.सी.सी. (ए) | | |
| एन.सी.सी. (बी) | | |
| एन.सी.सी. (सी) | | |

१८. अनुभव प्राप्त असल्यास त्याचा तपशील : १. -----------------------------------
२. -----------------------------------
३. -----------------------------------

१९. पूर्वी आणि सध्या करीत असलेल्या नोकरीचा तपशील.

| कार्यालयाचे /विभागाचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | वेतनश्रेणी | स्थायी किंवा तात्पुरती | रुजू झाल्याची तारीख | नोकरी सोडली असल्यास/सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

२०. (अ) आदिवासी प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/ होय / नाही
सेवा आयोजन कार्यालय/समाजकल्याण कार्यालय/
जिल्हाधिकारी यांचेकडे नांव नोंदणी केली आहे काय ?
(ब) नांव नोंदणी केले असल्यास नोंदणीचे ठिकाण नोंदणी क्रमांक, नोंदणी वर्ष.

नोंदणीचे ठिकाण ---------------------

नोंदणी क्रमांक ---------------------

नोंदणी वर्ष ---------------------

(क) नुतनिकरणाचा दिनांक : ---------------------
२१. लागू असलेल्या बाबीवर ( ☑ ) अशी खुण करावी.

(अ) विवाहित / अविवाहीत
(ब) विधुर / विधवा / लागू नाही
(क) विवाहित असल्यास मुला-मुलींची संख्या -------

२२. अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत काय ?

| | |
|---|---|
| १. इयत्ता ४ थी /७ वी/ शालांत परीक्षा प्रमाणपत्र (जन्मतारखेच्या दाखल्यासाठी) जोडले आहे काय ? | होय / नाही |
| २. एस.एस.सी./एच.एस.सी. / किमान अर्हता परिक्षेचे गुणपत्रक जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ३. जातीचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ४. जात वैधता प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ५. माजी सैनिक असल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ६. प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/स्वातंत्र्यसैनिकाचे पाल्य असल्याचे सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ७. आवश्यक रक्कमेचा न्यायालयीन फी मुद्रांक / रेखांकीत भारतीय पोस्टल ऑर्डर जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ८. महाराष्ट्र नागरीसेवा (लहान) कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ९. उन्नत व प्रगत गटात नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाचे (वर्ष २०११-१२) कालावधीचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| १०. अधिसंख्य पदावर वनमजूर असल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? | होय / नाही |
| ११. अर्जासोबतच्या विहित नमुन्यातील ओळखपत्र दोन प्रतीत जोडले आहे काय ? | होय / नाही |
| १२. अर्जासोबत संपुर्ण दस्ताऐवज स्वाक्षांकित करुन जोडले आहे काय? | होय / नाही |

(टिप :- वरील प्रमाणे सदर पदाकरीता आवश्यक दस्ताऐवजाच्या साक्षाकिंत प्रती जोडणे आवश्यक आहे)

दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी
स्थळ :- पुर्ण नांव व पत्ता

## उमेदवाराने स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

मी ---------------------------------------------------- प्रमाणित करतो /करते की, वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे. ------------------- या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता माझ्याकडे आहे याची खात्री करुनच हा अर्ज मी सादर करीत आहे.

मी आणखी असेही प्रमाणित करतो/करते की अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास या माहितीच्या आधारे मिळालेली नाकरी गमावण्यास मी बाध्य राहील व त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

अर्जदाराची सही
दिनांक : संपुर्ण नांव व पत्ता: ---------------------------
ठिकाण : ---------------------------
पिन कोड क्रमांक | | | | | | |

---

## लहान कुटूंबासंबंधी प्रतिज्ञापत्र

अमूना - अ
(नियम - ४)

मी श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------ श्री ---------------------------------- ----------------- यांचा /यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ---------- वर्ष -------- राहणार याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.
२) आज रोजी मला --------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत त्यापैकी दिनांक २८/३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------- इतकी आहे (असल्यास जन्म दिनांक नमूद करावा)
३) हयात असलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असतील तर दिनांक २८/३/२००५ वा तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अपात्र ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही
दिनांक : संपुर्ण नांव व पत्ता: ---------------------------
ठिकाण : ---------------------------
---------------------------
पिन कोड क्रमांक | | | | | | |

---

## ओळखपत्र/प्रवेशपत्र

उमेदवाराचे छायाचित्र राजपत्रीत अधिकारी/पिशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी साक्षांकीत करणे गरजेचे आहे.

१. उमेदवार क्रमांक : -------------------

२. उमेदवाराचे संपूर्ण नांव : ------------------------------------------
व पत्ता पिनकोड क्रमांकासह -------------------------------------

३. पदाचे नांव :- -------------------------------------------------

४. ओळखपत्र प्राप्त झाल्याची सही :-

५. परिक्षेचे तारखेस उपस्थित झालेबाबत सही :-

| अ.क्र. | बाबी | स्वाक्षरी | |
|---|---|---|---|
| | | उमेदवार | परीक्षक |
| १ | लेखी परिक्षा | | |
| २ | आवश्यक असल्यास व्यवसायीक चाचणी | | |
| ३ | मौखीक परिक्षा | | |

**सुचना :- अर्जासोबत ओळखपत्राचे दोन नमुने जोडावे.**

# उप वनसंरक्षक गडचिरोली वनविभाग गडचिरोली यांचे कार्यालय.

पोटेगांव रोड, तहसिल गडचिरोली.जिल्हा गडचिरोली. पिन ४४२ ६०५ (म.रा.)

---

**विषय :- भरती प्रक्रिया-२०१२**
जाहीरात प्रसिध्द करणेबाबत.

**क्रमांक :** कक्ष- ५(४)/आस्था/२०१२-१३/२८८१
**गडचिरोली**, दिनांक :- २८/१२/२०१२

प्रति,
जनसंपर्क विभागीय माहिती कार्यालय,
जुने सचिवालय, पहिला माळा,
नागपूर विभाग,
नागपूर.

मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), गडचिरोली हयांच्या अंतर्गत येणा-या वनविभागातील गट "क" मधील रिक्त पदे भरणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करावयाची असून त्याचा मजकुर तयार करुन प्रसिध्दीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) कार्यालयाचे नांव | : | उप वनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली |
| २) जाहीरात प्रकाशित करावयाची अंतिम तारीख | : | दिनांक १/१/२०१३ किंवा त्यापुर्वी |
| ३) प्रकाशित करण्याचा प्रकार | : | प्रादेशिक पातळीवर |
| ४) जाहिरातीकरीता प्रस्तुत वर्तमान पत्रके | : | मराठी भाषा (प्रादेशिक-१, जिल्हास्तरीय-१) |
| ५) जाहिरातीचे देयक कोणास सादर करावयाचे आहे | : | उप वनसंरक्षक, गडचिरोली वनविभाग, गडचिरोली |
| ६) प्रत्येक वर्तमान पत्रात कितीदा जाहिरात प्रसिध्द करावयाची आहे. | : | एकदाच |
| ७) विभागीय उप संचालक माहिती हयांना वर्तमान पत्रात फेरबदल करण्याचे अधिकार आहे काय ? | : | ---------------- |

**सहपत्र** :- जाहिरात मसुदा.

सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती, गडचिरोली
तथा
उपवनसंरक्षक
गडचिरोली वनविभाग, गडचिरोली

**प्रतिलिपी** :- १) अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, गडचिरोली तथा जिल्हाधिकारी, गडचिरोली यांना माहिती करीता सस्नेह अग्रेषित.

२) मा.मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली यांना माहिती करिता सविनय सादर.

३) सहाय्यक संचालक (जाहिरात) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन नवीन प्रशासकीय भवन, १७ वा माळा, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०००३२ यांना माहिती करिता सस्नेह अग्रेषित.

४) उप वनसंरक्षक, आलापल्ली/सिरोंचा/भामरागड/वडसा/प्रधानाचार्य मध्यवर्ती वनराजीक महाविद्यालय, चंद्रपूर यांना माहिती करिता सस्नेह अग्रेषित.

५) प्रत सूचना फलकावर लावणे करिता.